नि. १० खाली न्यायनिर्णय

न्यायनिर्णय
(दिनांक ४ मे, २०२३ रोजी पारीत)

१. अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील पि.डी. कपूर तसेच आरोपीतर्फे श्री व्ही.ए. सरोदे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

२. खालील मुददे/वादप्रश्न माझे विचारार्थ आले. खाली दिलेल्या कारणास्तव मी त्यांच्या समोरील निष्कर्षापर्यंत पोहचले.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १३/०९/२०२२ रोजीचे १६.०० ते १६.३० वाजताचे दरम्यान मौजा मोहदा ता. केळापूर, जि. यवतमाळ येथील आरोपीच्या राहते घरी आरोपीची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात ८ लिटर गावठी हातभटटीची दारु अवैधरित्या विना परवाना मिळुन आला आणि यादवारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदयाच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | ... नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

३. आरोपी विरुध्द लावलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार प्रशांत विठ्ठल राउत याची साक्ष नोंदविली आहे. अभियोगपक्षाला अनेकदा इतर सरकारी साक्षीदारांना हजर करण्याची संधी देउनसुध्दा अभियोग पक्ष साक्षीदार तपासण्यास असमर्थ राहिले. सबब नि. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात

आला. आरोपीविरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

<u>मुददे क्र. १ व २ करीताः</u>–

४. सा.क्र.१ प्रशांत विठ्ठल राउत याने त्याच्या पुराव्यात तो आरोपीला ओळखत असल्याचे व आरोपी त्याच्या गावातील रहिवासी असल्याचे कथन केले. त्याने पुढे असेही कथन केले की त्याला पोलिसांनी पंचनाम्याकरीता बोलवले नाही व त्याचे समक्ष काहीही जप्त केले नाही. सदर साक्षीदाराने जप्ती पंचनाम्यावर त्याची सही (नि. क्र.११) असल्याचे मान्य केले असले तरी, त्यातील मजकुर पुर्णपणे नाकारला. सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन सदर साक्षीदारास उलटतपासात विचारले जातील असे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली. परंतु अभियोग पक्ष जप्ती पंचनामा प्रमाणे आरोपीच्या ताब्यातुन गावठी हातभटटीची दारु जप्त केल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर आणण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे घटनेच्या वेळेस आरोपीच्या ताब्यातुन तथाकथीत मादक द्रव्य जप्त करण्यात आले होते असे म्हणणे न्यायोचीत होणार नाही. त्यामुळे या साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाला आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी उपयोगी ठरणारी नाही.

५. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) नुसार गुन्हा सिध्द होण्यासाठी जप्त मुददेमाल मादक द्रव्य दारु आहे व तसेच घटनेच्या वेळेस आरोपी मादक द्रव्य दारु विना परवाना त्याच्या जवळ बाळगुन होता ही बाब सिध्द होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या पुराव्यातुन जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यात होता हे सिध्द झालेले नाही. जप्त केलेले मादक द्रव्य दारु ही आरोपीकडुनच जप्त करण्यात आली ही बाब अभियोग पक्ष सिद्ध करु शकलेला नाही. अशा परिस्थितीत सबळ पुराव्या अभावी आरोपी विरुदध लावलेले आरोप सिध्द होत नाही. सबब मी मुददे क्र. १ चे उत्तर नकारार्थी देते. त्या अनुषंगाने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुददा क्र. २ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **कमलाबाई वासुदेव चव्हाण** हिची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीची वैयक्तिक व जमानतीची बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार आरोपीने रुपये १५०००/– चा जामीन न्यायालयात सादर करावा.

४. प्रकरणात जप्त मुद्देमाल ८ लिटर गावठी हातभटटीची दारु अपील कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क, पांढरकवडा यांच्यामार्फत नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

(**कु. स्नेहा एस. कुळकर्णी**)
दिनांक– ०४/०५/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, केळापूर
(न्यायालय क्र. २)